# धुळे जिल्ह्यातील इ. ४ थी व इ.७ वीच्या प्रगत विद्यार्थ्यांच्या संपादणुकीचा अभ्यास

## जिल्हास्तरीय लघु संशोधन
## नाशिक विभाग





संशोधक

**डॉ. मंजुषा क्षीरसागर** (प्राचार्य)

व

**डॉ. शिवाजी ठाकूर** (अधिव्याख्याता)

जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था,धुळे



– संशोधन केंद्र –

जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, धुळे

सन –२०२२–२३

# धुळे जिल्ह्यातील इ. ४ थी व इ.७ वीच्या प्रगत विद्यार्थ्यांच्या संपादणुकीचा अभ्यास

## जिल्हास्तरीय लघु संशोधन
## नाशिक विभाग


**संशोधक**

**डॉ. मंजुषा क्षीरसागर**
(प्राचार्य)
व
**डॉ. शिवाजी ठाकूर**
(अधिव्याख्याता)
जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, धुळे

**संशोधन सहाय्यक**

श्रीमती चेतना भटू पाटील
श्रीमती मनिषा शंकर पाटील
विषय साधनव्यक्ती
जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, धुळे



**संशोधन केंद्र**

जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, धुळे
सन २०२२-२३

# अनुक्रमणिका


| अ.क्र. | घटकांचे नाव | पृ. क्र. |
|---|---|---|
| **प्रकरण १ले** | **प्रस्तावना** | **५ ते ६** |
| १.१ | प्रास्ताविक | |
| १.२ | संशोधनाची गरज | |
| १.३ | संशोधनाचे महत्त्व | |
| १.४ | संशोधनाचे समस्या विधान | |
| १.५ | संशोधनाची उद्दिष्टे | |
| १.६ | संशोधनाची व्याप्ती | |
| १.७ | संशोधनाची मर्यादा | |
| **प्रकरण २ रे** | **संबंधित साहित्याचा आढावा** | **७** |
| २.१ | प्रास्ताविक | |
| २.२ | RTE-2009 | |
| २.३ | प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र शासन निर्णय | |
| २.४ | संबंधित साहित्याच्या अभ्यासाची गरज | |
| **प्रकरण ३ रे** | **संशोधन पद्धती** | **८ ते ९** |
| ३.१ | प्रास्ताविक | |
| ३.२ | संशोधनाची साधने | |
| ३.३ | संशोधनाची तंत्रे | |
| ३.४ | जनसंख्या | |
| ३.५ | नमुना निवड | |
| **प्रकरण ४ थे** | **माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन** | **१० ते १९** |
| ४.१ | प्रास्ताविक | |
| ४.२ | माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन- इ. ४ थी भाषा, गणित, इंग्रजी | |
| ४.३ | माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन- इ. ७ वी भाषा, गणित, इंग्रजी | |
| **प्रकरण ५ वे** | **संशोधनाचे निष्कर्ष व शिफारसी** | **२० ते ३१** |
| ५.१ | प्रस्तावना | |
| ५.२ | प्रमुख निष्कर्ष | |
| ५.३ | शिफारसी | |
| | संदर्भग्रंथ सूची व परिशिष्टे. | |

# प्रकरण १ ले

# प्रस्तावना

**१.१ प्रास्ताविक**

बालकांच्या मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ पारित झाल्यानंतर प्रत्येक मुलाला गुणवत्तापूर्ण शिक्षणाचा अधिकार मिळाला. महाराष्ट्र शासनाच्या शालेय शिक्षण विभागाचे प्रयत्न म्हणून प्रत्येक मूल विचारात घेण्यासाठी प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र शासन निर्णय २२ जून २०१५ ला पारित करण्यात आला. या शासन निर्णयानुसार प्रत्येक मूल वाचन, लेखन, संख्याज्ञान व संख्यांवरील क्रियांमध्ये अप्रगत राहू नये असे ठरविण्यात आले. याच शासन निर्णयाने पहिल्यांदा प्रत्येक मुलाची वर्गवारी अप्रगत, सामान्य आणि प्रगत अशा तीन विभागात करता येईल अशी दृष्टी शिक्षण क्षेत्राला दिली. प्रत्येक मूल शिकू शकते हा विश्वास या शासन निर्णयातून शिक्षकाला प्राप्त झाला. यामध्ये मराठी व गणित या दोन मूलभूत विषयांचा विचार करण्यात आला कारण ते विषय विद्यार्थ्यांना समजले की इतर विषय समजण्यातील अडचणी दूर होतात. हे सगळ्यांच्याच लक्षात येते. या शासन निर्णयानुसार विद्यार्थ्यांच्या पायाभूत संपादणूकीची नियमित पडताळणी केली गेली.

जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेमार्फत या शासन निर्णयानंतर जिल्ह्यामध्ये किमान तीन वेळा विद्यार्थ्यांचे इयत्तानिहाय आणि अपेक्षित क्षमता निहाय अध्ययन स्तर ठरविणाऱ्या चाचण्या घेण्यात आल्या. कोरोना काळानंतर विद्यार्थ्यांचे झालेले अध्ययन नुकसान भरून काढण्यासाठी जिल्ह्यात दोन, तीन वर्षांपासून शिक्षण क्षेत्रात प्रयत्न सुरू आहेत. आता राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० अंतर्गत पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान याबाबत काम करणे शिक्षण विभागात अपेक्षित आहे. ज्या मुलांना पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान प्राप्त आहे ती मूले त्या वर्गातील अपेक्षित क्षमता प्राप्त करू शकतात अशा क्षमता प्राप्त केलेल्या मुलांची घोषणा वर्गातील शिक्षकाने करावी आणि ते मूल प्रगत ठरवावे. प्रगत ठरविलेल्या मुलांना त्या वर्गातील अपेक्षित असलेल्या अध्ययन निष्पत्ती प्राप्त होतात किंवा नाही हे तपासून पहावे म्हणून शिक्षण विभागाच्या प्रमुख मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी शिक्षकाने घोषित केलेल्या २ प्रगत विद्यार्थ्यांची बीटस्तरावर चाचणी घेण्याचे ठरविले. त्याप्रमाणे दि.२५/०३/२०२३ रोजी चाचणी घेतल्यानंतर या प्रगत मुलांची अध्ययन संपादणूक स्थिती काय आहे. ती योग्य असल्यास जिल्ह्याला दिशा मिळेल किंवा अयोग्य असल्यास प्रगत मुलांवरही वेगळे उपचार करून ही मुले अप्रगत किंवा सामान्य गटात आहे किंवा कसे हे समजावे म्हणून प्रस्तुत संशोधन हाती घेण्यात आलेले आहे.

**१.२ संशोधनाची गरज**

१. NAS, SLAS असर व PGI यांच्या सर्वेक्षण अहवालानुसार धुळे जिल्ह्यातील विद्यार्थ्यांच्या मुलभूत क्षमतांबरोबर संबंधित इयत्तेच्या अपेक्षित सर्व क्षमतांची संपादणूक पातळी कमी प्रमाणात दिसून आल्याने प्रस्तुत संशोधन गरजेचे आहे.

२. प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र शासन निर्णयानुसार विद्यार्थ्यांच्या भाषिक व गणितीय कौशल्ये प्राप्तीसाठी विद्यार्थ्यांना योग्य अध्ययन अनुभव देणे. अध्ययन अध्यापन प्रक्रिया समृद्ध होणे गरजेचे आहे.

३. प्रस्तुत संशोधन इ. ५ वी ते इ. ८ वी ला घेतल्या जाणाऱ्या शिष्यवृत्ती परीक्षेसाठी प्रगत विद्यार्थी तयारी कशी आहे त्या दृष्टीने इ. ४ थी व ७ वीच्या २ प्रगत विद्यार्थ्यांची भाषा व गणितीय कौशल्यातील क्षमतांची पडताळणी गरजेची आहे म्हणून प्रस्तुत संशोधन विषयाच्या प्राप्त माहितीचे विश्लेषण होणे गरजेचे आहे.

## १.३ संशोधनाचे महत्त्व

१. धुळे जिल्ह्यात NAS, SLAS, असर व PGI या सर्वेक्षण अहवालात विद्यार्थ्यांचे भाषिक व गणितीय कौशल्यातील संपादणुकीत वाढ व्हावी या दृष्टीने प्रयत्न होण्यासाठी प्रस्तुत संशोधन महत्त्वाचे आहे.

२. प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र शासन निर्णयानुसार विद्यार्थ्यांची पायाभूत संपादणुकीची नियमित पडताळणी झाली तर शैक्षणिक दर्जा उंचावेल त्यासाठी प्रस्तुत संशोधन महत्त्वाचे आहे.

## १.४ संशोधनाचे समस्या विधान

धुळे जिल्ह्यातील स्थानिक स्वराज्य संस्थेच्या शाळेतील इ. ४ थी व इ. ७ वीच्या २ प्रगत विद्यार्थ्यांच्या संपादणुकीचा अभ्यास.

## १.५ संशोधनाची उद्दिष्ट्ये

१. धुळे जिल्ह्यातील स्थानिक स्वराज्य संस्थेच्या शाळेतील इ. ४ थी  ७ वीतील विद्यार्थ्यांची चाचणीद्वारा गुणवत्तेची सद्यस्थिती जाणून घेणे.

२. प्रगत विद्यार्थ्यांच्या संपादणुक गुणवत्तेचे विश्लेषण करणे.

## १.६ संशोधनाची व्याप्ती

१. प्रस्तुत संशोधनात धुळे जिल्ह्यातील स्थानिक स्वराज्य संस्थेच्या शाळेतील इ. ४ थी व ७ वीच्या वर्गातील प्रत्येकी २ प्रगत विद्यार्थ्यांचा समावेश करण्यात आला आहे.

२. प्रस्तुत संशोधन हे धुळे जिल्ह्यातील स्थानिक स्वराज्य संस्थेच्या शाळेतील इ. ४ थी व ७ वीच्या विद्यार्थ्यांची संपादणूक सद्यस्थिती तपासणे यापुरतेच व्याप्त आहे.

## १.७ संशोधनाची मर्यादा

१. प्रस्तुत संशोधन धुळे जिल्ह्यातील स्थानिक स्वराज्य संस्थेच्या इ. ४ थी व इ. ७ वीच्या वर्गातील प्रत्येकी २ प्रगत विद्यार्थ्यांपुरतेच मर्यादित आहे.

२. प्रस्तुत संशोधन धुळे जिल्ह्यातील स्थानिक स्वराज्य संस्थेच्या इ. ४ थी व इ. ७ वीच्या वर्गातील प्रगत विद्यार्थ्यांची चाचणीद्वारा सद्यस्थिती तपासण्यापुरतेच मर्यादित आहे.

# प्रकरण २ रे

# संबंधित साहित्याचा आढावा

**२.१ प्रास्ताविक**

धुळे जिल्ह्यातील प्रगत विद्यार्थ्यांच्या संपादणुक स्थितीचा अभ्यास करण्यासाठी काही संदर्भिय शासन निर्णयांचा अभ्यास करण्यात आलेला आहे.

**२.२ बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ :**

प्रत्येक बालकाला गुणवत्तापूर्ण शिक्षणाचा हक्क मिळालेला आहे. कलम २९(२)(ह) नुसार सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन पद्धतीद्वारे विद्यार्थ्यांच्या ज्ञान, आकलन आणि उपयोजन क्षमतांची पडताळणी करणे आवश्यक आहे.

**२.३ प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र कार्यक्रम शासन निर्णय दि. २२ जून २०१५.**

१. सर्व नियमित विद्यार्थ्यांना किमान अपेक्षित क्षमता असणे गरजेचे आहे.

२. सर्व विद्यार्थ्यांच्या क्षमता संपादणुकीची खात्री शैक्षणिक प्रगती चाचणीद्वारे केली जाईल.

३. विद्यार्थ्यांची चाचणीद्वारे गुणवत्ता तपासणे व सुधारणे गरजेचे आहे.

वरील संदर्भिय शासन निर्णयाचा उपयोग संशोधनात पुढील संकल्पना विकसित करण्यासाठी झालेला आहे.

**२.४. संबंधित साहित्याच्या अभ्यासाची गरज**

१. संशोधन साधन साहित्याच्या निर्मितीसाठी

२. संशोधनाची विश्लेषणात्मक मांडणी करण्यासाठी

३. संशोधनाचे निष्कर्ष व शिफारशी मांडण्यासाठी यावरून प्रत्येक मूल गुणवत्तापूर्ण शिकले पाहिजे ही समज विकसित होण्यासाठी प्रस्तुत संशोधन हाती घेण्यात आलेले आहे.

# प्रकरण ३ रे

# संशोधन पद्धती

### ३.१ प्रास्ताविक

प्रस्तुत संशोधन कोणत्या पद्धतीने केले, माहिती संकलनासाठी कोणकोणत्या पद्धती व साधने वापरली, नमुना निवड तक्ते कशाप्रकारे तयार केले याबद्दल माहिती दिलेली आहे. प्रस्तुत संशोधनात सर्वेक्षण संशोधन पद्धती वापरली आहे.

### ३.२ संशोधनाची साधने

प्रस्तुत संशोधनात लेखी चाचणी घेऊन विद्यार्थी संपादणूक सद्यस्थिती जाणून घेण्यासाठी प्रश्नपत्रिका या साधनाचा उपयोग केलेला आहे.

### ३.३ संशोधनाची तंत्रे

विद्यार्थी गुणवत्तेची सद्यस्थिती तपासणेसाठी जि. प. धुळे अंतर्गत सर्व विभागातील अधिकारी व कर्मचारी यांच्या संनियंत्रणाखाली स्थानिक स्वराज्य संस्थेच्या शाळेतील इ. ४ थी व इ. ७ वी च्या वर्गातील दोन प्रगत विद्यार्थ्यांची चाचणी घेण्यात आली. त्याद्वारे दस्तऐवज संकलित करून त्या सामग्रीवरून अर्थनिर्वचन करण्यात आले. अर्थनिर्वचन करण्यासाठी टक्केवारी या सांख्यिकीय प्रणालीचा वापर करण्यात आला.

### ३.४ जनसंख्या

धुळे जिल्ह्यातील स्थानिक स्वराज्य संस्थेच्या शाळेतील इ. ४ थी व इ. ७ वी च्या वर्गातील सर्व विद्यार्थी संशोधनाची जनसंख्या आहे.

| अ.क्र. | तालुका | इ. ४ थी | | इ. ७ वी | |
|---|---|---|---|---|---|
| | | शाळा संख्या | एकूण विद्यार्थी संख्या | शाळा संख्या | एकूण विद्यार्थी संख्या |
| ०१. | धुळे | २२५ | ५४६७ | २१ | ३८१ |
| ०२. | साक्री | ४४२ | ६३०३ | १४ | २६४ |
| ०३. | शिंदखेडा | १६८ | २९६८ | ०८ | १३८ |
| ०४. | शिरपूर | २६८ | ५१६६ | १२ | २८६ |
| | **एकूण** | **११०३** | **१९९०४** | **५५** | **१०६९** |

### ३.५ नमुना निवड

धुळे जिल्ह्यातील स्थानिक स्वराज्य संस्थेच्या शाळेतील इ. ४ थी व इ. ७ वी च्या वर्गातील २ प्रगत विद्यार्थी संशोधनाची नमुना निवड आहे.

| अ.क्र. | तालुका | इ. ४ थी | | इ. ७ वी | |
|---|---|---|---|---|---|
| | | एकूण विद्यार्थी संख्या | प्रत्येक शाळेतील २ प्रगत विद्यार्थी | एकूण विद्यार्थी संख्या | प्रत्येक शाळेतील २ प्रगत विद्यार्थी |
| ०१. | धुळे | ५४६७ | ४२३ | ३८१ | ३० |
| ०२. | साक्री | ६३०३ | ८५० | २६४ | २१ |
| ०३. | शिंदखेडा | २९६८ | ३१९ | १३८ | १० |
| ०४. | शिरपूर | ५१६६ | ५१६ | २८६ | १६ |
| | **एकूण** | **१९९०४** | **२१०८** | **१०६९** | **७७** |

# प्रकरण ४ थे

# माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन

**४.१ प्रस्तावना**

जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, धुळे व शिक्षण विभाग अंतर्गत धुळे जिल्ह्यातील स्थानिक स्वराज्य संस्थेच्या इ. ४ थी व इ. ७ वी च्या २ प्रगत विद्यार्थ्यांची बीटस्तरावर चाचणी घेवून मिळालेल्या माहितीवरून विश्लेषण व अर्थनिर्वचन या प्रकरणात करण्यात आलेले आहे.

## इ. ४ थी (भाषा)

| अ. क्र. | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन निष्पत्तीवर आधारित प्रश्न | गुण |
|---|---|---|---|
| १) | स्वत:चे म्हणणे मांडतांना भाषेच्या विविध वैशिष्ट्यांचा बारकाईने वापर करतात. | १) तुमच्या गावातील दुकानावर/घरावर/शाळेत लिहिलेल्या २ सूचना येथे लिहा. | २ गुण |
| २) | आपल्या कल्पकतेनुसार गोष्ट, कविता,वर्णन इत्यादी लिहितांना भाषेचा सर्जनशीलतेने वापर करतात. | २) सुरुवातीला एक वाक्य दिले आहे. तुमच्या मनाने पुढील २ वाक्ये लिहा<br>एका गाडीचा अपघात झाला. | २ गुण |
| ३) | वाचलेला मजकूर आणि दैनंदिन अनुभव यांची सांगड घालून त्यातून निर्माण झालेल्या संवेदना आणि विचार तोंडी/लेखी स्वरूपात व्यक्त करतात. | ३) शेतकरी शब्दाचा वापर करून दोन वाक्य लिहा. | २ गुण |
| ४) | विविध उद्देशांसाठी लेखन करतांना योग्य विरामचिन्हांचा (पूर्णविराम, अल्पविराम, प्रश्नचिन्ह) जाणीवपूर्वक वापर करतात. | ४) विरामचिन्हांचा वापर करून वाक्य पुन्हा लिहा. राणी आजीला म्हणाली, 'बघ ना आजी आपला सोनू मला चिडवतो.' | २ गुण |
| ५) | पाठ्यपुस्तकाव्यतिरिक्त इतर मजकुराचे (बालसाहित्य, वर्तमान पत्रांतील ठळक शीर्षक, प्रसिद्धी फलक इत्यादी) यांचे समजपूर्वक वाचन करतात. | ५) खालील वाक्य वाचन करा.<br>६) खालील परिच्छेद वाचन करा. | ३ गुण<br>४ गुण |

## इ. ४ थी (गणित)

| अ. क्र. | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन निष्पत्तीवर आधारीत प्रश्न | गुण |
|---|---|---|---|
| १)<br>२) | २ ते ३ अंकी संख्यांचा गुणाकार करतात<br>दैनंदिन जीवनात संख्यांवरील क्रियांचा वापर करतात. | १) गुणाकार करा<br>२) शाब्दिक उदाहरणे सोडवा | ६ गुण |
| ३) | मीटरचे सेमीमध्ये आणि सेमीचे मीटरमध्ये रूपांतर करतात. | ३) ८४५ सेंटीमीटर म्हणजे ...मीटर...सेंटीमीटर | |
| ४) | नाणी, नोटा, लांबी, वस्तुमान आणि धारकता यांचा संबंध असणारे दैनंदिन जीवनातील प्रश्न किंवा प्रसंग तयार करण्यासाठी व सोडवण्या-साठी चार क्रियांचा उपयोग करतात. | ४) शाब्दिक उदाहरणे सोडवा | २ गुण |
| ५) | लांबी, अंतर, वजन, आकारमान यासंबंधीचे, दैनंदिन जीवनातील चार मूलभूत गणिती क्रियांचा अंतर्भाव असणारे प्रश्न सोडवितात. | ५) शाब्दिक उदाहरणे सोडवा | २ गुण |
| ६) | दैनंदिन जीवनातील घटनांना लागणारा वेळ किंवा घटनांमधील कालावधी पुढे मोजून किंवा मागे मोजून, तसेच बेरीज-वजाबाकी करून गणन करतात. | ६) शाब्दिक उदाहरणे सोडवा | २ गुण |

## इ. ४ थी (इंग्रजी )

| अ. क्र. | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन निष्पत्तीवर आधारित प्रश्न | गुण |
|---|---|---|---|
| 01. | Guess the meaning of words, phrases and sentences from the context.Uses appropriate orammatically forms in communication (for ex. noun, pronoun, verb, determines time & tense) | 1) Complete the sentences<br>2) Write the name of colour<br>3) Match the pair<br>4) Words related to the given word. | 2 Marks<br>2 Marks<br>1 Marks |
| 02. | Writes as directed one word answers choosing only one correct option, writing in complete sentences, writing no fever/morelines than expected etc. | | |

## इ. ७ वी (भाषा)

| अ. क्र. | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन निष्पत्तीवर आधारित प्रश्न | गुण |
|---|---|---|---|
| १) | कोणतेही चित्र/घटना पाहून त्यांचे स्वत:च्या पद्धतीने तोंडी/सांकेतिक भाषेत वर्णन करतात. | १) अवकाळी पावसामुळे होणाऱ्या नुकसानाबद्दल २ वाक्य लिहा. | २ गुण |
| २) | स्वत:चे अनुभव स्वत:च्या भाषाशैलीत लिहितात लेखनाचे विविध प्रकार व शैली यांचा उपयोग करून आपला अनुभव लिहितात. उदा. कथा, कविता, निबंध इ. | २) देशासाठी लढणाऱ्या सैनिकांबद्दल २ वाक्य लिहा.<br>३) माणसाने निसर्गाकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलायला हवा या वाक्याचा तुम्हाला समजलेला अर्थ २ ओळीत लिहा. | २ गुण<br>२ गुण |
| ३) | वाचलेल्या साहित्यातील नवीन शब्द, वाक्प्रचार, म्हणी यांचे अर्थ समजून घेऊन त्यांचा आस्वाद घेतात. | ४) या वाक्प्रचाराचा वाक्यात उपयोग करा. कणव निर्माण होणे. | २ गुण |
| ४) | विविध प्रकारचे साहित्य वाचून त्याबद्दल गटामध्ये चर्चा करतात. | ५) खालील वाक्याचे वाचन करा.<br>६) परिच्छेद वाचन | ३ गुण<br>४ गुण |

## इ. ७ वी (गणित)

| अ. क्र. | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन निष्पत्तीवर आधारित प्रश्न | गुण |
|---|---|---|---|
| १) | विशिष्ट परिस्थितीत लसावि, मसावि चे उपयोजन करतो. | १) मसावि काढा<br>२) लसावि काढा | २ गुण<br>२ गुण |
| २) | दोन पूर्णांकाचा गुणाकार/भागाकार करतो. | ३) गुणाकाराची/भागाकाराची शाब्दिक उदाहरणे, | ३ गुण |
| ३) | शेकडा तोटा आणि शेकडा नफा तसेच व्याजाचा शेकडा दर काढतो. | शेकडा नफा, शेकडा तोटा, व्याजाचा रोकडा दर शाब्दिक उदाहरणे | ३ गुण |

# इ. ७ वी (इंग्रजी )

| अ. क्र. | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन निष्पत्तीवर आधारित प्रश्न | गुण |
|---|---|---|---|
| 01. | Writes as directed one word answer choosing only one correct option, writing in complete sentences, writing no fever/ more lines than expected etc | Words related to the given word | 2 Marks |
| 02. | Uses appropriate oramatically forms incommunication (for noun, pronoun, verb, determines times & tense) | Complete the following table | 2 Marks |
| 03. | Enriches vocabulary through reading | Writing the plurals write likes & dislikes write the antonyms | 2 Marks |
| 04. | Understands announcement & speech on familiar topics | Write sentences about yourself | 3 Marks |

## ४.१.१ इयत्ता ४ थी (भाषा)

| तालुका | ० ते ५ | ६ ते १० | ११ ते १५ |
|---|---|---|---|
| शिरपूर | २८.२९ | ४३.९९ | २७.७१ |
| धुळे | २९.७८ | ३४.९९ | ३५.२४ |
| शिंदखेडा | ४०.७५ | ३०.४० | ३०.४१ |
| साक्री | ३७.७० | ३७.८८ | २९.४१ |
| **एकूण** | **३२.२५** | **३७.६६** | **३०.०७** |

**४.१.१ विश्लेषण :–**

वरील तक्त्याचे निरीक्षण केले असता असे निदर्शनास येते की, १) धुळे जिल्ह्यातील शिरपूर तालुक्यातील इ. ४ थी च्या विद्यार्थ्याला मराठी भाषेत १५ पैकी ० ते ५, ६ ते १०, ११ ते १५ गुण मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांची टक्केवारी अनुक्रमे २८.२९, ४३.९९, २७.७१ इतकी आहे. २) धुळे तालुक्यातील इ. ४ थीतील १५ पैकी ० ते ५, ६ ते १० व ११ ते १५ गुण प्राप्त करणाऱ्या विद्यार्थ्यांची टक्केवारी अनुक्रमे २९.७८, ३४.९९, ३५.२४ दिसून येते. ३) शिंदखेडा तालुक्यात इ. ४ थीच्या विद्यार्थ्यांचा मराठी विषयातील १५ पैकी ० ते ५, ६ ते १०, ११ ते १५ गुण प्राप्त करणारे विद्यार्थी अनुक्रमे ४०.७५, ३०.४०, ३०.४१ टक्के दिसून येते. ४) साक्री तालुक्यात इ. ४ थी विद्यार्थ्यांचा मराठी विषयातील १५ पैकी ० ते ५, ६ ते १०, ११ ते १५ गुण प्राप्त करणारे विद्यार्थी अनुक्रमे ३७.७०%, ३७.८८%, २९.४१% दिसून येते.

**४.१.१ अर्थनिर्वचन :–**

धुळे जिल्ह्यात इ.४ थीच्या प्रगत विद्यार्थ्यांची भाषा विषयातील संपादणूक एकाही तालुक्याची ५०% पेक्षा जास्त नाही. यावरून भाषिक कौशल्यांमध्ये संपादणूक कमी आहे.

धुळे जिल्ह्यात इ. ४ थीच्या प्रगत विद्यार्थ्यांची चाचणीत ० ते ५ गुण मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांची संपादणूक शिंद-खेडा तालुक्यात ४०.७५%, ६ ते १० गुण मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांची संपादणूक शिरपूर तालुक्यात ४३.९९ व ११ ते १५ गुण मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांची संपादणूक धुळे तालुक्यात ३५.२४ एवढी दिसून येते. यावरून भाषा विषयातील संपादणूक ५०%पेक्षा जास्त नसल्याने भाषिक कौशल्यातील संपादणूक कमी आहे.

## ४.१.२ इयत्ता ४ थी (गणित)

| तालुका | ० ते ५ | ६ ते १० | ११ ते १५ |
|---|---|---|---|
| शिरपूर | १५.३१ | ५७.९४ | २६.७४ |
| धुळे | २४.९४ | ४८.२४ | २६.८२ |
| शिंदखेडा | २९.६५ | ४८.२६ | २२.०८ |
| साक्री | २७.५६ | ४३.११ | २९.३३ |
| **एकूण** | **२४.३५** | **४८.५५** | **२७.१०** |

**४.१.२ विश्लेषण :–**

वरील तक्त्याचे निरीक्षण केले असता असे निदर्शनास येते की, १) धुळे जिल्ह्यातील शिरपूर तालुक्यातील इ. ४ थी च्या विद्यार्थ्यांना गणित विषयात १५ पैकी ० ते ५, ६ ते १०, ११ ते १५ गुण मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या अनुक्रमे १५.३१%, ५७.९४%, २६.७४%, दिसून येते. २) धुळे तालुक्यात इ. ४ थीच्या विद्यार्थ्यांना गणित विषयात १५ पैकी ० ते ५, ६ ते १० व ११ ते १५ गुण मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या अनुक्रमे २४.९४%, ४८.२४%, व २६.८२% दिसून येते. ३) शिंदखेडा तालुक्यात इ. ४ थीच्या विद्यार्थ्यांना गणित विषयात १५ पैकी ० ते ५, ६ ते १०, ११ ते १५ गुण मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या अनुक्रमे २९.६५%, ४८.२६% व २२.०८% टक्के दिसून येते. ४) साक्री तालुक्यात इ. ४ थी च्या विद्यार्थ्यांना गणित विषयात १५ पैकी ० ते ५, ६ ते १०, ११ ते १५ गुण मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या अनुक्रमे २७.५६%, ४३.११%, २९.३३% दिसून येते.

**४.१.२ अर्थनिर्वचन –**

धुळे जिल्ह्यात इ.४ थीच्या वर्गातील विद्यार्थ्यांची गणित विषयातील संपादणूक ५०% पेक्षा जास्त नाही. यावरून धुळे जिल्ह्यात गणितीय कौशल्यामध्ये संपादणूक अत्यंत कमी आहे.

## ४.१.३ इयत्ता ४ थी (इंग्रजी)

| तालुका | ० ते ३ | ४ ते ५ |
|---|---|---|
| शिरपूर | ४१.८६ | ५८.१३ |
| धुळे | ४३.७३ | ५६.२६ |
| शिंदखेडा | ५१.०९ | ४८.९० |
| साक्री | ४५.५२ | ५४.४७ |
| **एकूण** | **४५.११** | **५४.८८** |

**४.१.३ विश्लेषण :–**

वरील तक्त्याचे निरीक्षण केले असता असे निदर्शनास येते की,

१) धुळे जिल्ह्यात इ. ४ थी च्या विद्यार्थ्यांना इंग्रजी विषयात ५ पैकी ० ते ३, ४ ते ५ गुण मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या शिरपूर तालुक्यात अनुक्रमे ४१.८६% व ५८.१३% इतकी आहे.

२) धुळे तालुक्यात इ.४ थीच्या विद्यार्थ्यांना इंग्रजी विषयात ५ पैकी ० ते ३, ४ ते ५ गुण मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या ४३.७३% व ५६.२६% दिसून येते.

३) शिंदखेडा तालुक्यात इ. ४ थीच्या विद्यार्थ्यांना इंग्रजी विषयात ५ पैकी ० ते ३ गुण मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या ५१.०९% तर ४ ते ५ गुण मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या ४८.९०% दिसून येते.

४) साक्री तालुक्यात इ. ४ थीच्या विद्यार्थ्यांना इंग्रजी विषयात ५ पैकी ० ते ३, ४ ते ५ गुण मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या अनुक्रमे ४५.५२% व ५४.४७% दिसून येते.

**४.१.३ अर्थनिर्वचन**

धुळे जिल्ह्यात इ.४ थीच्या विद्यार्थ्यांची ५ पैकी ४ ते ५ गुण मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या ५०% पेक्षा जास्त आहे. त्यातच शिरपूर तालुक्यात इंग्रजी विषयातील संपादणूक सर्वात जास्त आहे.

## ४.२.१ इयत्ता ७ वी (भाषा)

| तालुका | ० ते ५ | ६ ते १० | ११ ते १५ |
|---|---|---|---|
| शिरपूर | १८.७५ | ५६.२५ | २५.०० |
| धुळे | ५०.०० | २०.०० | ३०.०० |
| शिंदखेडा | ४०.०० | ३०.०० | ३०.०० |
| साक्री | ००.०० | १४.२८ | ८५.७१. |
| **एकूण** | **२८.५७** | **२७.२७** | **४४.१५** |

**४.२.१ विश्लेषण :-** वरील तक्त्याचे निरीक्षण केले असता असे निदर्शनास आले की,

१) धुळे तालुक्यात इ. ७ वी च्या विद्यार्थ्यांची भाषा विषयातील संपादणूक १५ पैकी ० ते ५, ६ ते १०, ११ ते १५ गुण प्राप्त करणारे विद्यार्थी अनुक्रमे ५०%, २०%, ३०% दिसून येते.

२) शिरपूर तालुक्यातील इ. ७ वीच्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या शाळेतील विद्यार्थ्यांची भाषा विषयातील संपादणूक १५ पैकी ० ते ५, ६ ते १०, ११ ते १५ गुण प्राप्त करणारे विद्यार्थी अनुक्रमे १८.७५%, ५६.२५%, २५% दिसून येते.

३) शिंदखेडा तालुक्यातील इ. ७ वीच्या विद्यार्थ्यांची भाषा विषयातील संपादणूक १५ पैकी ० ते ५, ६ ते १०, ११ ते १५ गुण प्राप्त करणारे विद्यार्थी अनुक्रमे ४०%, ३०%, ३०% याप्रमाणे दिसून येते.

४) साक्री तालुक्यातील इ. ७ वीच्या विद्यार्थ्यांची भाषा विषयातील संपादणूक चाचणीत १५ पैकी ० ते ५, ६ ते १०, ११ ते १५ गुण प्राप्त करणारे विद्यार्थी अनुक्रमे ०%, १४.२८%, ८५.७१% याप्रमाणे दिसून येते.

**४.२.१ अर्थनिर्वचन :**

धुळे जिल्ह्यातील इ. ७ वीच्या वर्गातील विद्यार्थ्यांच्या भाषिक कौशल्यातील संपादणूक ही चारही तालुक्यात अत्यंत कमी दिसून येते म्हणजे ५०% पेक्षा जास्त नाही. यावरून भाषिक कौशल्यांमध्ये संपादणूक कमी आहे.

## ४.२.२ इयत्ता ७ वी (गणित)

| तालुका | ० ते ५ | ६ ते १० | ११ ते १५ |
|---|---|---|---|
| शिरपूर | २२.२२ | ७७.७७ | ००.०० |
| धुळे | ८०.०० | १६.६६ | ०३.३३ |
| शिंदखेडा | ९०.०० | १०.०० | ००.०० |
| साक्री | ५७.१४ | २८.५७ | १४.२८ |
| **एकूण** | **६२.०२** | **३२.९१** | **५.०६** |

**४.२.२ विश्लेषण :-** वरील तक्त्याचे निरीक्षण केले असता असे निदर्शनास आले की,

१) धुळे जिल्ह्यातील शिरपूर तालुक्यात इ. ७ वी च्या विद्यार्थ्यांची गणित विषयातील संपादणूक १५ पैकी ० ते ५, ६ ते १०, ११ ते १५ गुण मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या अनुक्रमे २२.२२%, ७७.७७%, ००.००%, दिसून येते.

२) धुळे तालुक्यात इ. ७ वीच्या विद्यार्थ्यांची गणित विषयातील संपादणूक १५ पैकी ०ते ५, ६ ते १० व ११ ते १५ गुण मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या अनुक्रमे ८०.००%, १६.६६%, व ०३.३३% दिसून येते.

३) शिंदखेडा तालुक्यात इ. ७ वी च्या विद्यार्थ्यांची गणित विषयातील संपादणूक १५ पैकी ० ते ५, ६ ते १०, ११ ते १५ गुण मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या अनुक्रमे ९०.००%, १०.००%, ०.००% दिसून येते.

४) साक्री तालुक्यात इ. ७ वीच्या विद्यार्थ्यांची गणित विषयातील संपादणूक १५ पैकी ५७.१४%, २८.५७%, १४.२८% दिसून येते.

४.२.२. **अर्थनिर्वचन :**

धुळे जिल्ह्यातील इ. ७ वीच्या वर्गातील विद्यार्थ्यांची गणित विषयातील संपादणूक ही चारही तालुक्यात सर्वात जास्त ० ते ५ गुण प्राप्त करणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या ६२.०२% दिसून येते तर सर्वात कमी ११ ते १५ गुण प्राप्त करणारे ५.०६% दिसून येते. यावरून इ. ७ वीच्या वर्गातील विद्यार्थ्यांची गणित विषयातील संपादणूक अत्यल्प दिसून येते.

## ४.३.३ इयत्ता ७ वी (इंग्रजी)

| तालुका | ० ते ५ | ६ ते १० | ११ ते १५ |
|---|---|---|---|
| शिरपूर | ५.५५ | ५०.०० | ४४.४४ |
| धुळे | ३०.०० | ५०.०० | २०.०० |
| शिंदखेडा | ३०.०० | ३०.०० | ४०.०० |
| साक्री | २३.८१ | ४७.६२ | २८.५७ |
| एकूण | २२.७८ | ४६.८३ | ३०.३८ |

**४.३.३ विश्लेषण :-** वरील तक्त्याचे निरीक्षण केले असता असे निदर्शनास आले की,

१) शिरपूर तालुक्यात इ. ७ वी च्या विद्यार्थ्यांची इंग्रजी विषयातील संपादणूक १५ पैकी ० ते ५, ६ ते १०, ११ ते १५ गुण प्राप्त करणारे विद्यार्थी अनुक्रमे ५.५५%, ५०%, ४४.४४% दिसून येते.

२) धुळे तालुक्यात इ. ७ वीच्या विद्यार्थ्यांची इंग्रजी विषयातील संपादणूक १५ पैकी ० ते ५, ६ ते १०, ११ ते १५ गुण मिळविणाऱ्या विद्यार्थी अनुक्रमे ३०%, ५०%, २०% दिसून येते.

३) शिंदखेडा तालुक्यात इ. ७ वीच्या विद्यार्थ्यांची इंग्रजी विषयातील संपादणूक १५ पैकी ० ते ५, ६ ते १०, ११ ते १५ गुण प्राप्त करणाऱ्या विद्यार्थ्याची संख्या अनुक्रमे ३०%, ३०%, ४०% याप्रमाणे दिसून येते.

४) साक्री तालुक्यातील इ. ७ वीच्या विद्यार्थ्यांची इंग्रजी विषयातील संपादणूक १५ पैकी ० ते ५, ६ ते १०, ११ ते १५ गुण प्राप्त करणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या अनुक्रमे २३.८१%, ४७.६२%, २८.५७% याप्रमाणे दिसून येते.

**४.३.३ अर्थनिर्वचन :**

धुळे जिल्ह्यातील इ. ७ वीच्या वर्गातील विद्यार्थ्यांची इंग्रजी विषयातील संपादणूक ही चारही तालुक्यात सर्वात जास्त ६ ते १० गुण प्राप्त करणारे विद्यार्थी संख्या ४६.८३% दिसून येते. तर सर्वात कमी ० ते ५ गुण प्राप्त करणारे विद्यार्थी संख्या २२.७८% दिसून येते. इंग्रजी विषयातील संपादणूक ५०% पेक्षा जास्त नाही. यावरून इंग्रजी भाषेतील कौशल्यामध्ये संपादणूक कमी आहे.

# प्रकरण ५ वे

# संशोधनाचे निष्कर्ष व शिफारशी

**५.१ प्रस्तावना**

जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, धुळे व जि.प. धुळे यांच्या संयुक्त विद्यमाने धुळे जिल्ह्यातील स्थानिक स्वराज्य संस्थेच्या इ. ४ थी व ७ वीच्या शाळेतील प्रगत विद्यार्थ्यांची भाषा, गणित, इंग्रजी विषयातील संपादणूक जाणून घेण्यासाठी चाचणी घेण्यात आली. संकलित माहितीवरून असे निदर्शनास आले की, भाषिक कौशल्ये (भाषा, इंग्रजी) व गणितीय कौशल्यातील विद्यार्थी संपादणूक अतिशय कमी दिसून आली. प्राप्त माहितीवरून पुढीलप्रमाणे निष्कर्ष काढण्यात आले.

**५.२. निष्कर्ष**

१. धुळे जिल्ह्यात इ. ४ थी व ७ वी च्या विद्यार्थ्यांमध्ये भाषा, गणित व इंग्रजी विषयातील अपेक्षित असलेल्या अध्ययन निष्पत्तीमध्ये विद्यार्थी संपादणूक फारच कमी दिसून येते.

२. अध्ययन निष्पत्तीमध्ये अपेक्षित असलेले लक्ष प्राप्त करून घेण्यासाठी नेमक्या कोणत्या कृती वर्गशिक्षकाने विद्यार्थ्यांकडून करून घ्याव्यात हे समजले,.

**५.३ शिफारसी**

प्रस्तुत संशोधनात धुळे जिल्ह्यातील स्थानिक स्वराज्य संस्थेच्या शाळांमधील इ. ४ थी व इ. ७ वीच्या प्रगत विद्यार्थ्यांची भाषा, गणित व इंग्रजी विषयातील संपादणूक सद्यस्थिती जाणून घेण्यात आली त्यावर निष्कर्ष काढून पुढील शिफारशी सादर करीत आहोत.

**१. शिक्षक**

इ. ४ थी व ७ वी च्या वर्गशिक्षकांनी इयत्तानिहाय अध्ययन निष्पत्ती लक्षात घेऊन त्यावर आधारित विविध कृती व उपक्रमांची अंमलबजावणी करावी व विद्यार्थ्यांच्या पायाभूत क्षमता विकसित कराव्यात.

**२. मुख्याध्यापक**

विषयानुरुप अध्ययन निष्पत्ती साध्य करण्यासाठी वेळोवेळी वर्गशिक्षकांचा आढावा घेऊन गुणवत्तेत वाढ होणेसाठी योग्य ते मार्गदर्शन करावे.

**३. केंद्रप्रमुख**

१. केंद्रप्रमुखांनी आपल्या अधिनस्त येणाऱ्या सर्व शाळांमधील मुख्याध्यापक व शिक्षक यांना इ. ४ थी व ७ वीच्या विद्यार्थ्यांमध्ये भाषा, गणित व इंग्रजी विषयाच्या पायाभूत क्षमता विकसित करण्यासंदर्भात वेळोवेळी मार्गदर्शन करावे.

२. आपल्या अधिनस्त येणाऱ्या सर्व शाळांसाठी विद्यार्थी स्तरनिहाय कृती कार्यक्रमाची आखणी करून शाळास्तरावर त्याची योग्य पद्धतीने अंमलबजावणी होत आहे की नाही याबाबत भेटी दरम्यान आढावा घेणे.

**४. पर्यवेक्षीय यंत्रणा**

शिक्षण विस्तार अधिकारी/गटशिक्षणाधिकारी/प्रशासन अधिकारी म.न.पा. यांनी आपल्या अधिनस्त येणाऱ्या सर्व शाळांमध्ये भाषा, गणित व इंग्रजी विषयाच्या पायाभूत क्षमता विकसित करण्यासंदर्भात मासिक बैठकीत व शिक्षण परिषदेत मार्गदर्शन करणे व वेळोवेळी आढावा घेणे.

# संदर्भग्रंथ सूची


१. इ. १ ली ते ४ थी च्या पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान अंतर्गत भाषिक व गणितीय कौशल्ये प्राप्तीबाबतचे जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेची सर्व परिपत्रके.

२. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण - २०२०

मानव संसाधन विकास मंत्रालय (शिक्षण मंत्रालय) भारत सरकार

३. मुलभूत साक्षरता व संख्याज्ञान - शासन निर्णय

२७ ऑक्टोबर २०२१ शालेय शिक्षण व क्रीडा विभाग महाराष्ट्र शासन.

# परिशिष्टे – १

## शिक्षण विभाग (प्राथमिक), जिल्हा परिषद, धुळे
## व जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, धुळे यांच्या संयुक्त विद्यमाने

**इ.४ थी - चाचणी**

विषय - भाषा          वेळ - ३० मिनिटे          गुण १५

---

विद्यार्थ्याचे नाव ----------------------------------------------------------------

शाळा ----------------------------------------ता.---------------------जि. धुळे.

--------------------------------------------------------------------------------

१. तुमच्या गावातील दुकानावर/घरावर/शाळेत लिहिलेल्या २ सूचना येथे लिहा (२ गुण)

-------------------------------------------------------------------

-------------------------------------------------------------------

-------------------------------------------------------------------

२. सुरुवातीला एक वाक्य दिले आहे. तुमच्या मनाने पुढील ३ वाक्ये लिहा (३ गुण)

एका गाडीचा अपघात झाला

-------------------------------------------------------------------

-------------------------------------------------------------------

-------------------------------------------------------------------

३. शेतकरी या शब्दाचा वापर करून २ वाक्य लिहा (२ गुण)

-------------------------------------------------------------------

-------------------------------------------------------------------

-------------------------------------------------------------------

४. विरामचिन्हांचा वापर करून वाक्य पुन्हा लिहा (२ गुण)

राणी आजीला म्हणाली बघ ना आजी आपला सोनू मला चिडवतो

-------------------------------------------------------------------

-------------------------------------------------------------------

५. खालील परिच्छेद वाचन करून प्रश्नांची उत्तरे लिहा.

हिमालय मानवी अतिक्रमणांमुळे अधिक धोकेदायक बनत आहे. मानवी वसाहतींच्या विस्तारामुळे अनेक समस्या उद्भवत आहेत. मात्र या हस्तक्षेपाकडे गांभीर्याने पाहिले जात नाही. हे दुर्दैव आहे. १९७० च्या दशकात वृक्ष वाचविण्यासाठी ''चिपको'' आंदोलन उभे राहिले.

**प्रश्न :**

१) चिपको आंदोलन कशासाठी झाले? (२ गुण)

---------------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------------

२) हिमालय कशामुळे धोकेदायक बनत आहे? (२ गुण)

---------------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------------

३) चिपको आंदोलन कोणत्या वर्षी झाले? (२ गुण)

---------------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------------

# परिशिष्टे २

**Std.4th** **English** **Marks -5**

**01. Complete the Sentences** **(2 Marks)**

**a. My name is** ______________________________

**b. I like** ___________________________________

**02. Write the name of colour** **(2 Marks)**

**a. The colour of leaf is** _________________________

**b. The colour of tomato is** ______________________

**03. Match the Pair** **(1 Marks)**

| | | |
|---|---|---|
| **2** | | **Six** |
| **6** | | **Ten** |
| **9** | | **Two** |
| **10** | | **Nine** |

# परिशिष्टे ३

**शिक्षण विभाग (प्राथमिक), जिल्हा परिषद, धुळे व जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, धुळे**

**यांच्या संयुक्त विद्यमाने**

**इ. ४ थी चाचणी**

विषय - गणित वेळ - ३० मिनीटे गुण १५

विद्यार्थ्यांचे नाव ------------------------------------------------------------

शाळा ----------------------------------- ता. ----------------- जि. धुळे.

---

**१. रिकाम्या जागा भरा** ( ५ गुण)

अ) अडुसष्ट हजार पाच ही संख्या अंकात लिहा.-------------------------------

ब) सर्वात लहान ५ अंकी संख्या अंकात लिहा --------------------------------

क) ९ वाजून ३० मिनिटे म्हणजे --------------------------- वाजले.

ड) दीड किलोग्रॅम म्हणजे ------------------ ग्रॅम

इ) ८४५ सेंटीमीटर म्हणजे ---------------मीटर -------------सेंटीमीटर

**२. सोडवा** ( ४ गुण)

अ) बेरीज करा. ७६८९ + ४७३५ ब) वजाबाकी करा. ६०३०-४०४३

क) गुणाकार करा. ५०७ X ५६ ड) भागाकार करा. ३६÷ ६

**३. शाब्दिक उदाहरणे सोडवा** **(६ गुण)**

| | |
|---|---|
| अ) एका क्रीडांगणाची आसनक्षमता २५,००० आहे. सामन्यांच्या वेळी ११५५५ स्त्रिया व ११५४५ पुरूष हजर होते तर किती आसने रिकामी होती? | |
| ब) २० रुपयाच्या ५ नोटा व १० रुपयाच्या ३ नोटा म्हणजे किती रुपये होतात? | |
| क) २ ऑक्टोबर रोजी सुरू झालेले स्वच्छता मिशन ८ ऑक्टोबर पर्यंत सुरू होते, तर हे मिशन एकूण किती दिवस सुरू होते? | |

# परिशिष्टे १

**शिक्षण विभाग (प्राथमिक), जिल्हा परिषद, धुळे व जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, धुळे**

**यांच्या संयुक्त विद्यमाने**

इ. ७ वी चाचणी

विषय -भाषा वेळ - ३० मिनीटे गुण १५

विद्यार्थ्यांचे नाव ----------------------------------------------------------

शाळा ---------------------------------- ता. ----------------- जि. धुळे.

१. अवकाळी पावसामुळे होणाऱ्या नुकसानाबद्दल २ वाक्ये लिहा ( २ गुण)

---------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------

२. देशासाठी लढणाऱ्या सैनिकाबद्दल २ वाक्ये लिहा (२ गुण)

---------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------

३. माणसाने निसर्गाकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलायला हवा. या वाक्याचा तुम्हाला समजलेला अर्थ **(२ गुण)**
२ ओळीत लिहा

---------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------

४. या वाक्प्रचाराचा वाक्यात उपयोग करा. कणव निर्माण होणे. (२ गुण)

---------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------

५. परिच्छेद वाचन करून प्रश्नांची उत्तरे लिहा

युक्का पतंग आणि युक्का वनस्पती पूर्णपणे एकमेकांवर अवलंबून असतात. जवळजवळ दरवर्षी मार्च ते जून या कालावधीत युक्का फुले उमलतात त्यांच्या अप्रतिम वासाने भुरळ पडलेले युक्का पतंग जमिनीतून बाहेर पडतात. युक्का पतंग सामान्यतः पांढरे असतात. काहींवर काळे ठिपके असतात किंवा राखाडी-काळेही असतात.

**प्रश्न -**

१. युक्का फुले कोणत्या कालावधीत उमलतात? (२ गुण)

-----------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------

२. युक्का पतंग कशामुळे जमिनीच्या बाहेर पडतात? (२ गुण)

-----------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------

३. युक्का पतंग कोणकोणत्या रंगाचे असतात? (२ गुण)

-----------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------

५. वरील परिच्छेदाला योग्य नाव (शीर्षक) द्या (१ गुण)

-----------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------

# परिशिष्टे २

**शिक्षण विभाग (प्राथमिक), जिल्हा परिषद, धुळे व जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, धुळे**

**यांच्या संयुक्त विद्यमाने**

| | | |
|---|---|---|
| इ. ७ वी | | चाचणी |
| विषय -गणित | वेळ - ३० मिनीटे | गुण १५ |

विद्यार्थ्यांचे नाव -------------------------------------------------------

शाळा --------------------------------- ता. ---------------- जि. धुळे.

१. १६, २७ या दोन संख्यांचा मसावि काढा (२ गुण)

२. १८, ६३ या दोन संख्यांचा लसावि काढा. ( २ गुण)

**सोडवा**

३. एका शासकीय गोदामातील धान्यसाठा ४००० माणसांना ३० दिवस पुरतो. तर तो धान्यसाठा ६००० माणसांना किती दिवस पुरेल? (३ गुण)

४. विराट व सम्राट यांनी अनुक्रमे ५०००० रुपये व १२०००० रुपये गुंतवून व्यवसाय चालू केला. या व्यवसायात त्यांना २०% तोटा झाला. तर प्रत्येकाला किती तोटा झाला? **( ३ गुण)**

५. जावेदने १२००० रुपये व द.सा.द.शे. ९ दराने काही वर्षांसाठी बँकेत ठेवले. तो दरवर्षी व्याजाची रक्कम काढून घेई. किती वर्षात त्याला व्याजासह १७४०० रुपये मिळतील? (३ गुण)

६. १२ क्विंटल सोयाबीनला ३६००० रुपये लागतात तर ८ क्विंटल सोयाबीनची किंमत किती ? ( २ गुण)

# परिशिष्टे ३

## Education Department (Primary) Z.P. Dhule &
## District Institute of Education & Training, Dhule

**Std. 7 th (Test)**

Sub - English | Time - 30 Minuts | Marks - 15


Students Name ____________________________________________

School ______________________ Tal. ________________ Dist. Dhule.

---

Q.1 : Write at least six words related to the given word. "School" 2 Marks

Ans :






Q.2. Write the plurals of ____________ 2 Marks

Ans : 1. Child ____________ 3. Leaf ____________

2. Woman ____________ 4. Mouse ____________

Q.3 Write your two likes and two dislikes. 2 Marks




Q.4 What rules would you like to make for your class?

Ans. Rules for the class. 2 Marks

1.________________________________________________

2.________________________________________________

3.________________________________________________

4. ________________________________________________

Q. 5 Complete the following table. 2 Marks

Ans

| Verb | Past | Perfect |
|---|---|---|
| See | Saw | Seen |
| Do | ____ | Done |
| Go | Went | _____ |
| _____ | Wrote | written |
| Sing | _____ | Sung |

Q,6. Write the antonyms of ____________________ 2 Marks

Ans. 1) Lazy x ______________

2) Rude x ______________

3) Firm x ______________

4) Careless x ______________

Q. 7. Write sentences about yourself` 3 Marks

Ans : 1) ______________________________________________

2) ______________________________________________

3) ______________________________________________

4) ______________________________________________

5) ______________________________________________

6) ______________________________________________

# जिल्हा शिक्षण प्रशिक्षण संस्था, धुळे

